अग्रलेखांचा नवाकाळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवाकाळ

।। न मे भक्तः प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवाकाळ बादशहा

# लोकशाहीतले एक मोठे वर्तुळ पूर्ण झाले आहे

लोकसभा निवडणुकीच्या विजयाचे कवित्व आणखी महिनाभर चालेल. ज्या निवडणुकीत कोणालाही प्रत्यक्ष न दिसणारी मोदी लाट होती हे आता सिध्द झालेले आहे. निवडणुकीतल्या या विजयासाठी कोणाकोणाची मदत झाली अशा प्रकारचे मुद्देदेखील आता मांडले जात आहेत. मग अगदी भारतीय जनता पार्टीचे पितृत्व असलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने आपली यंत्रणा कामाला लावली अशा प्रकारच्या भंपक विधानांपासून ते उत्तरप्रदेशात अमित शहा यांनी कशी जादू घडवून आणली इथपर्यंत त्याचे निष्कर्ष काढले जात आहेत. परंतु अशा प्रकारे अकलेचे तारे तोडण्यापेक्षा लोकांना कॉंग्रेसच्या कारभाराचा संताप आला होता. त्यांना बदल हवा होता. ती योग्य संधी भारतीय जनता पार्टी आणि विशेषत: नरेंद्र मोदी यांनी साधली. तंत्रज्ञानाचा वापर करून आणि अगदी आधुनिक मार्केटिंग पध्दतीने भारतीय जनता पार्टीने आपल्या प्रॉडक्टची भरपूर जाहिरात केली. लोकांना हे नवे प्रॉडक्ट पसंत पडले आणि त्यांनी त्याला कौल दिला. ही त्यातली अत्यंत वस्तुनिष्ठ परिस्थिती आहे. कोणतीही निवडणूक म्हटली की प्रत्येक पक्षाला प्रचार करावाच लागतो. परंतु तरुण मतदार आणि भ्रष्टाचाराविरुध्दची देशभरात निर्माण झालेली जागृती आणि परिवर्तनाची उत्कंठा या तीन गोष्टींमुळे हे सत्तांतर घडून आलेले आहे. आता या सत्तांतराचा भारतीय लोकशाहीच्या दृष्टीने विचार झाला पाहिजे. हे सत्तांतर म्हणजे भारतीय लोकशाहीच्या ६५ वर्षांच्या प्रवासातले एक वर्तुळ पूर्ण झाल्याचे स्पष्टपणे दिसून येते. आतापर्यंत कॉंग्रेस बहुमताने विजयी होत होती. जनता राजवटीमध्ये अनेक पक्षांचे कडबोळे असलेली जनता पार्टी विजयी झाली होती. राम मंदिर प्रश्नामुळे भाजपाच्या जागा वाढल्या होत्या पण पूर्ण बहुमत मिळाले नव्हते. कॉंग्रेसशिवाय कोणत्याही एका पक्षाला गेल्या पासष्ट वर्षामध्ये पूर्ण बहुमत मिळवता आले नव्हते. ते देण्याचे काम या निवडणुकीत झाले आणि आता कॉंग्रेसच्या बरोबरीने पूर्ण बहुमत मिळवणारा तितकाच सशक्त पक्ष म्हणून भारतीय जनता पार्टी देशाच्या राजकीय क्षितिजावर उदयाला आली आहे. म्हणूनच लोकशाहीत ज्या गोष्टींची अत्यंत आवश्यकता होती ते घडून आले आणि लोकशाहीतल्या भवितव्यासाठी आवश्यक असे एक वर्तुळ पूर्ण झाले आहे.

### भाजपाचे बहुमत आणि मित्र पक्षांची मर्जी

एकूण सत्तांतराच्या प्रक्रियेप्रमाणे मोदी यांचा पंतप्रधानपदी शपथविधी होईल. सोळावी लोकसभा अस्तित्वात येईल. मंत्रिमंडळ आकाराला येईल. भारतीय जनता पार्टीने निवडणुकीपूर्वीच २५ अन्य मित्र पक्षांशी युती केली होती. आता त्यांना मंत्रिमंडळात स्थान द्यायचे की नाही याचाही निर्णय करावा लागेल. त्यांना मंत्रिमंडळात घेतले तर मोदी यांचे सरकार हे भारतीय जनता पार्टीच्या नेतृत्वाखालचे आघाडीचे सरकार म्हणूनच ओळखले जाईल. याचा वेगळा परिणाम होऊ शकतो. त्याचे राजकीय संदर्भदेखील बदलू शकतात. तब्बल २८२ म्हणजे बहुमताला लागणाऱ्या जागांपेक्षा १० जागा जास्त मिळाल्या आहेत. लोकांनी एकट्या भाजपाला बहुमत दिलेले आहे. अशा परिस्थितीत सरकार बनवताना अन्य घटक पक्षांना मंत्रिपद देणे भाजपाला भाग पडेल. मोदींनी मोठ्या खुबीने एक वाक्य उच्चारले होते. सरकार चालवण्यासाठी बहुमताची आवश्यकता आहे पण सरकार चालवण्याकरता आम्ही सगळ्यांना बरोबर घेऊन काम करू. असे एक राजकीय मुत्सद्देगिरीचा नमुना असलेले हे वाक्य आहे. परंतु मित्र पक्षांना मंत्रिपदे देण्याची वेळ आली तर आपोआपच तडजोडींना सुरुवात होईल या मित्रपक्षांची मर्जी सांभाळण्याकरता अनावश्यक निर्णय घेण्याचीसुध्दा मोदींवर वेळ येऊ शकते. अशा प्रसंगी मोदींनी खंबीरपणा दाखवला. तरच त्यांना मिळालेल्या बहुमताचा त्यांनी योग्य वापर केला हे सिद्ध होईल. देशाला आवश्यक असलेल्या स्थिर सरकारचा अनुभव लोकांना हवा आहे. मित्र पक्षांच्या मर्जीसाठी तडजोडीची सर्कस सुरू झाली तर मात्र पुन्हा एकदा आघाडीचेच सरकार केंद्रात चालू आहे असे लोकांना वाटू शकेल. म्हणूनच तब्बल ६५ वर्षांनी भारतीय लोकशाहीत खरे तर विरोधी पक्षाला पूर्ण बहुमत मिळाले आहे. ज्या बहुमताचा बहुआयामी उपयोग करण्याचे कौशल्य मोदींना दाखवायचे आहे. देशाच्या विकासासाठी प्रगतीसाठी स्थिर सरकारचीच गरज आहे. या मुद्दाचे महत्व लोकांनी देखील पटले. कारण दिल्लीमध्ये विधानसभा निवडणुकांच्यावेळी परिवर्तनाच्याच बाजूने तिथल्या लोकांना आम आदमी पार्टीच्या बाजूने मतदान केले परंतु खूप नवीन असलेला पक्ष बहुमत मिळवू शकला नाही. दिल्लीकरांना स्थिर सरकार मिळू शकले नाही. पन्नास दिवसामध्येच तिथल्या राजकीय अस्थिरतेने त्या नवख्या सरकारचा बळी घेतला. याचा अर्थ मतदारांनी विचारपूर्वक स्थिर सरकारची गरज ओळखली आणि मतदान केलेले आहे. ही गोष्ट लोकशाहीच्या मूल्यसंवर्धनासाठी अत्यंत अभूतपूर्व आणि ऐतिहासिक ठरते.

### छोट्या पक्षांचे महत्त्व संपेल

आता या वर्तुळातून काही ठळक विकास घडवून आणला गेला पाहिजे. किंबहुना यापुढचा भारतातल्या लोकशाहीचा प्रवास हा अधिक भक्कम पणे आणि जबाबदारपणे होऊ शकेल. पुढच्या कोणत्याही निवडणुकांमध्ये कुठल्या तरी एका राजकीय पक्षाला बहुमत देण्याच्या दृष्टीनेच लोकांचा कल राहू शकतो. किंबहुना आगामी लोकसभा निवडणुकीतसुध्दा बहुमत हा विषय केंद्रस्थानी राहू शकतो. यापुढे हळूहळू कावळ्याच्या छत्रीसारख्या उगवलेल्या छोट्या-छोट्या पक्षांचे महत्त्व कमी होईल. प्रादेशिक पक्ष आपापल्या राज्यामध्ये मात्र आपला प्रभाव टिकवून ठेवू शकतील. ज्यावेळी राष्ट्रीय पातळीवरच्या लोकसभेसारख्या निवडणुका होतील किंवा ज्यातून देशाच्या पंतप्रधानपदी कोण असावे याची निवड करण्याची वेळ येईल त्यावेळी कोणत्या तरी एका पक्षाला बहुमत देण्याच्या बाजूने हळूहळू लोकांचा कल निर्माण होऊ शकेल अशी ही एक मोठी लोकशाहीसाठी आवश्यक असलेली गरज पूर्ण झालेली आहे. म्हणूनच आतापर्यंत एकाच म्हणजेच कॉंग्रेस पक्षाकडे असलेली बहुमताची मक्तेदारी संपुष्टात आली. आणि आता भारतीय जनता पार्टी हा पक्षदेखील कॉंग्रेससाठी एक समर्थ पर्याय राहु शकतो. असे चित्र निर्माण झाले आहे. आता फक्त मोदी किंवा भाजपाचे सरकार कसे काम करते आणि लोकांचा हा बहुमताचा विश्वास किती सार्थ ठरवते याच्यावर बरेच अवलंबून आहे. अस्थिर असलेल्या लोकशाहीच्या लंबकाचे या वर्तुळामुळे हेलकावे थांबणार आहेत.